Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/उ.मा./परीक्षा/645
दिनांक :- 29 MAY 2024

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
सातारा/ सांगली/ कोल्हापूर.

**विषय:- उच्च माध्यमिक (इ.12वी) प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्च 2024 परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थ्यांच्या मूळ गुणपत्रिका, स्थलांतर प्रमाणपत्र, इतर साहित्य आणि मार्च 2025 परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची योग्यता प्रमाणपत्रे वितरणाबाबत...**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, आपल्या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत उच्च माध्यमिक (इयत्ता 12 वी) प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्च 2024 परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या मूळ गुणपत्रिका, स्थलांतर प्रमाणपत्र, तपशिलवार गुण दर्शविणारे कनिष्ठ महाविद्यालयीन अभिलेख आणि मार्च 2025 परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची योग्यता प्रमाणपत्रे संबंधित वितरण केंद्रावर सोमवार दि.03/06/2024 रोजी सकाळी 11.00 वाजता हस्तपोहोच वाटप करण्यात येणार आहे. तरी सदर दिवशी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या अधिकृत प्रतिनिधीस पत्रासह वितरण केंद्रावर पाठविण्याची व्यवस्था करावी.

सदर सर्व गुणपत्रिका, स्थलांतर प्रमाणपत्र व योग्यता प्रमाणपत्रे आपल्याच कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या आहेत याची खात्री करावी. अन्य कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका, स्थलांतर प्रमाणपत्र व योग्यता प्रमाणपत्रे प्राप्त झाल्या असतील तर त्या सिलबंद करुन आपल्या प्रतिनिधीमार्फत त्वरित या कार्यालयाकडे जमा करण्यात याव्यात. तसेच आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील एखाद्या विद्यार्थ्याची गुणपत्रिका, स्थलांतर प्रमाणपत्र किंवा योग्यता प्रमाणपत्रे प्राप्त न झालेस दि.06/06/2024 अखेर मंडळ कार्यालयास लेखी कळविण्यात यावे. तद्नंतर काही त्रुटी राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची राहील याची नोंद घ्यावी.

तसेच उच्च माध्यमिक (इयत्ता 12 वी) प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्च 2024 परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या मूळ गुणपत्रिका व स्थलांतर प्रमाणपत्रांचे आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात सोमवार दि.03/06/2024 रोजी दुपारी 3.00 नंतर वाटप करण्यात यावे.

**(सुभाष रा.चौगुले)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**